
# कोकरे, सावंत यांना 'साहित्य अकादमी'

## बाल साहित्य, युवा पुरस्कारांची घोषणा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** साहित्य अकादमीच्या 'युवा' व 'बाल' पुरस्कारांची बुधवारी घोषणा करण्यात आली. मराठी भाषेसाठी प्रदीप कोकरे यांच्या 'खोल खोल दुष्काळ डोळे' या कादंबरीसाठी व सिंधी भाषेसाठी मंथन बचानी यांच्या 'पांधीअड़ो' या कवितासंग्रहाची 'युवा' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. 'बाल' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी बालसाहित्यकार कवी डॉ. सुरेश सावंत यांची त्यांच्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहासाठी निवड करण्यात आली.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या बैठकीत वर्ष २०२५ साठी 'युवा' व 'बाल' साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. २३ लेखकांना युवा साहित्य पुरस्कार, तर २४ लेखकांना बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाले. मानचिन्ह आणि ५० हजार रुपये असे पुरस्कारांचे स्वरूप आहे. डोगरीमधील युवा पुरस्कार विजेत्याची घोषणा करण्यात आलेली नाही.




'खोल खोल दुष्काळ डोळे' ही कादंबरी आधुनिक तरुण पिढीच्या भावविश्वाचे आणि त्यांच्या जीवनातील संघर्षांचे प्रामाणिक आणि मार्मिक चित्रण करते. मुंबईच्या चाळीतील जीवन, बदलते सामाजिक- सांस्कृतिक संदर्भ आणि तरुण मनातील भावनिक हुंदके यांचे प्रभावी चित्रण या कादंबरीत आहे. कादंबरीतील नायकाच्या वरवर निरर्थक वाटणाऱ्या कृती हळूहळू चिंतनशील आणि अस्तित्वाच्या शोधाकडे वळतात, ज्यामुळे ही कादंबरी नव्या पिढीचा सशक्त आवाज मानली जाते. प्रदीप कोकरे यांचे लेखन ग्रामीण आणि शहरी जीवनातील बारकावे तसेच आधुनिक तरुणांच्या भावनांचे गहन चित्रण करते.

'पांधीअड़ो' हा मंथन बचानी यांनी लिहिलेल्या सिंधी कवितांचा जिवंत संग्रह आहे. मंथन बचानी हे मुंबईचे आहेत. त्यांचा कवितासंग्रह अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावा यासाठी कवीने हे पुस्तक देवनागरी आणि अरबी लिपीमध्ये केलेले आहे. समकालीन सिंधी अनुभवात रुजलेले प्रेम, निसर्ग, तारुण्य, ओळख आणि सांस्कृतिक संबंध या विषयांचा शोध या कवितासंग्रहात बचानी यांनी घेतला आहे.

डॉ. सावंत यांच्या लेखनाची भाषा अत्यंत साधी, भावपूर्ण आणि कल्पनाशील असून ती मुलांना सहज समजणारी आहे. त्यांच्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहातील रचना मुलांच्या कल्पनाविश्वाला साद घालणाऱ्या आहेत. निसर्ग, आकाश, स्वप्ने आणि बालमनाच्या भावविश्वाशी निगडित असलेल्या या कविता मुलांना आनंद, समज आणि सौंदर्यदृष्टी देतात.